जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
Address – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
E-Mail ID : crimepress.pune@gov.in Ph.020 / 26122478

# दैनंदिन गुन्हयांची प्रेसनोट

## पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.२६/०१/२०२५
## दि.२५/०१/२०२५ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | सिंहगड रोड पो स्टे ५४/२०२५,भा.न्या.सं.कलम,२८५,२८१,१२५(अ),१२५(ब),१०६(१),मो.वा.का कलम १८४,११९/१७७ |
| **फिर्यादी** | दत्तात्रय राख पोलीस अंमलदार सिंहगड रोड,पोलीस स्टेशन पुणे शहर |
| **आरोपीत** | आयशर मिनी बसवरील चालक (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२५/०१/२०२५ रोजी स. ५/०३ वा सुमा.वडगाव ब्रिजचे सुरुवातीस राष्ट्रीय महामार्ग क्र ४८ मुंबईकडे जाणारे लेनवर,वडगाव,पुणे |
| **तपशिल** | यातील नमुद आयशर मिनी बसवरील चालक याने त्याचे ताब्यातील आयशर मिनी बस ही नमुद ठिकाणी रोडचे कडेला धोकादायक स्थितीत ,वाहतुकीचे नियमांकडे दुर्लक्ष करुन उभी केल्याने स्विफ्ट कार हि पाठिमागुन आयशर मिनी बसला धडकवुन त्या कारमधुन प्रवास करणारे ५ इसम यांना गंभीर दुखापत होवुन महिला नामे स्मित समीर पवार वय १९ वर्षे रा.रा.पिंपळे गुरव पुणे हिचे मृत्युस कारणीभुत झाला. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी.अक्षय पाटील मो.नं. ९९२२२१०११० |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | भारती विद्यापीठ पो स्टे ६४/२०२५,भा.न्या.सं.कलम,२८१,१०६(१),मो.वा.का कलम १८४,११९/१७७ |
| **फिर्यादी** | अक्षता झुंजार वय ३४ वर्षे रा.आंबेगाव बुाा,पुणे |
| **आरोपीत** | अनंत पांडुरंग झुंजार वय ४४ वर्ष,रा.प्लॅट ४०५,श्रीराम अपार्टमेट आंबेगाव बुाा,पुणे (मयत) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१९/०१/२०२५ रोजी ०५/०० वेदांत हॉटेल समोर,आंबेगाव पुणे सार्वजजिक रोडवर |
| **तपशिल** | यातील नमुद इसम हा फिर्यादीचा पती असुन याने त्याचे ताब्यातील दुचाकी ही हलगर्जी, व निष्काळजीपणे बेदरकारपणे,वाहतुकीच्या नियमांकडे दुर्लक्ष करून चालवित असताना नमुद ठिकाणी दुचाकी घसरून खाली पडला असता, त्याचे डोक्याला मार लागुन गंभीर दुखापत होऊन तो स्वताःचे मरणास कारणीभुत झाला. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी.वाघमारे मो.नं.७०२०८४७३११ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | चंदननगर पो स्टे ५०/२०२५,भा.द.वि.कलम ४१९,४२०,माहिती व तंत्रज्ञान का.क.६६(ड) |
| **फिर्यादी** | एक इसम वय ३६ वर्ष रा.चंदननगर,पुणे |
| **आरोपीत** | मोबाईल धारक (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | २०२३ ते २४/०१/२०२४ रोजी ऑनलाईन माध्यमाव्दारे |
| **तपशिल** | यातील नमुद मोबाईल धारक यांनी फिर्यादी यांना ॲप मधुन ट्रेडिंग केले असता मोठया प्रमाणात नफा मिळवुन देण्याच्या अमिष दाखवुन पैसे भरण्यास भाग पाडुन फिर्यादीची २०,००,०००/-रू.ची अर्थिक फसवणुक केली. |
| **त.अंमलदार** | वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्रीमती सिमा ढाकणे मो.नं.८८८८८३०७१४ |

४

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | हडपसर पो स्टे ११७/२०२५,भा.न्या.सं. ३०९(४),३(५) |
| **फिर्यादी** | एक महिला वय ६५ वर्षे, रा.हडपसर पुणे |
| **आरोपीत** | दोन अनोळखी इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२२/०१/२०२५ रोजी दु.१५/०० वा.चे सुमा.महादेव मंदीर,मगरपट्टा ब्रिजचे खाली हडपसर, पुणे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी ह्या नमुद ठिकाणी रिक्षाची वाट पाहत उभे असताना नमुद दोन अनोळखी इसमांनी फिर्यादींना बाजुला घेवुन,चाकुचा धाक दाखवुन फिर्यादीचे कानातले दागिने गळयातले मनी व पैशांचा पाऊच असा ४२,०००/- रु.चा ऐवज जबरदस्तीने झटका मारुन नेला. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. महेश कवळे मो.नं ९६८९९५६९९९ |

५

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | नादेंड सिटी पो स्टे ५३/२०२५,भा.न्या.सं. ३०९(४),३(५) |
| **फिर्यादी** | एक इसम वय ३२ वर्षे रा.रायकर मळा धायरी,पुणे |
| **आरोपीत** | चार अनोळखी इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१४/०१/२०२५ रोजी रात्रौ २०/०० वा चे सुमा. डी.एस.के.विश्व शाळे जवळ धायरी पुणे |
| **तपशिल** | यातील नमुद एका इसमाने फिर्यादींना एका ॲपवर मॅसेज करून फिर्यादी बरोबर ओळख वाढून भेटायला बोलवून त्याचे मोटार सायकलवर बसवून नमुद ठिकाणी नेवून येथे लपलेल्या त्याचे आणखी तीन साथीदारांनी फिर्यादींना हत्याराचा धाक दाखवून जबरदस्तीने फिर्यादीच्या कानातील २४,५००/-रू.कि.च्या सोन्याच्या बाळ्या, मोबाईल हॅडसेट, रोख रक्कम व ऑनलाईन ट्रान्सफर केलेली रक्कम जबरी चोरी करून नेली. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी.शिवाजी बुनगे मो.नं.८६६९४६४९०३ |

## प्रेस नोट दि.२६/०१/२०२५

## दि.२६/०१/२०२५ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | कोंढवा पो स्टे ६७/२०२५,भा.न्या.सं.कलम ३३१(३),३३१(४),३०५ |
| **फिर्यादी** | एक इसम वय ४१ वर्षे रा.कोंढवा बुाा,पुणे |
| **आरोपीत** | अज्ञात इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२४/०१/२०२५ रोजी दु.१२.०० वा ते दि. २५/०१/२०२५ रोजी रात्रौ २३/१५ वा. दरम्यान ए २०३, हेवनपार्क सोसा,आदर्श हॉस्पीटल समोर,कोंढवा बुाा,पुणे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचा नमुद ठिकाणाचा फ्लॅट बंद असताना कोणीतरी अज्ञात इसमाने त्यांचे फ्लॅटचे दरवाजाचे कुलुप व लॅचलॉक तोडुन आत प्रवेश करुन बेडरुम मधील लाकडी कपाटामध्ये ठेवलेले ७,६५,०००/- रू.कि.चे सोन्याचे दागिने व रोख रक्कम घरफोडी करुन चोरी करून नेली. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी.बालाजी डिगोळे मो.नं.८१०८४३१११५ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | चतुःश्रृंगी पो स्टे ५९/२०२५ भा.न्या.सं.कलम १०९(१),३५२,३५१(२),११८(२)सह महा.पो.अधि ३७(१)१३५ |
| **फिर्यादी** | एक इसम वय ३५ वर्षे, रा.गोखलेनगर,पुणे |
| **आरोपीत** | एक इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२५/०१/२५ रोजी रात्री १९/०० वा चे सुमा.१०१ रामोशीवाडी,रत्ना हॉस्पिटलच्या पाठीमागे, मुलींच्या बोर्डीगजवळ गोखलेनगर,पुणे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचा भाऊ नमुद इसम याने दारू पिण्यासाठी आईकडे दोनशे रुपये मागितले त्यास आईने नकार दिल्याने त्याने आईस शिवीगाळ व मारहाण करू लागला म्हणून फिर्यादी हे भांडण सोडविण्यासाठी गेले असता त्यांना सुध्दा लोखंडी हत्याराने डोक्यात मारून जीवे ठार मारण्याच्या उद्देशाने गंभीर जखमी करून फिर्यादीच्या आईलाही डोक्यात मारून गंभीर जखमी केले. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. गणेश धामणे ०२०/२५६५५३३५ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**